# जागतिकीकरण आणि आदिवासी मराठी साहित्य

**डॉ. कुंदा बाळासाहेब कवडे**
*कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी*
*ता. पारनेर, जि. अहमदनगर*

जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूची किंवा घडामोडींची जागतिक स्तरावर स्थानांतरनाची प्रक्रिया होय. विसाव्या शतकाच्या शब्दकोशानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे. एकाच वेळी संपूर्ण जगाचा किंवा जगातील सर्व लोकांचा विचार करणे होय. भारतात १९९० च्या सुमारास जागतिकीकरणाला सुरुवात झाली. जागतिकीकरणाबरोबर उदारीकरण व खाजगीकरण यांचा पण समावेश होतो. यांनाच एकत्रितपणे खा.उ.जा धोरण असे संबोधले जाते. "संजय भास्कर यांच्यामते, मुख्य:ता व्यापारासाठी विविध देशांनी एकमेकांना जोडून घेत एकमेकांच्या भूमीत स्वतंत्रपणे व्यापार करण्यासाठीची व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण हा विषय सर्वार्थाने आपल्या चर्चेच्या केंद्रस्थानी राहात आला आहे. हा विषय वगळून आपल्याला नवीन वाड्मयीन, सांस्कृतिक स्थित्यंतराचा विचारच करता येणार नाही कारण सामाजिक, राजकीय आणि साहित्य क्षेत्रासह सर्वच पर्यावरण या विषयाने प्रभावित झाले आहे. जागतिकीकरणाने आपल्या समग्र आशा सांस्कृतिक आकृतीबंधाला नवा आकार दिल्यामुळे एका नव्या संस्कृतीचा उदय झाला आहे. ही संस्कृती तंत्रज्ञानाने व्यापलेली असल्यामुळे आपले सांस्कृतिक वैविध्य आणि भाषा व साहित्यावर याचा मोठा मोठा परिणाम झाला आहे. या परिणामांची चर्चा या पूर्वी खूप मोठ्या प्रमाणात आणि वेगवेगळ्या माध्यमातून होत आहे. या संदर्भात 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' हा ग्रंथ महत्त्वाचा वाटतो. या ग्रंथात जागतिकीकरणाच्या परिणामांची आणि त्याचबरोबर एकूणच मराठी साहित्यात घडून आलेल्या स्थित्यंतराची चर्चा करण्यात आली आहे.

आज माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषा देखील ग्लोबल झाली आहे. भारतासारख्या विकसनशील प्रादेशिक देशात विविध जाती धर्म, भाषा, संस्कृती, भिन्नता असल्यामुळे हे आव्हान मोठे स्वरूप धारण करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिक्षण, गुणवत्ता, मुक्तप्रदेश, रोजगाराच्या संधी आणि व्यावसायिक शिक्षण, स्वायत्ततेची जबाबदारी असे अनेक प्रश्न जागतिकिकरणारत उभे असताना मातृभाषेतून शिक्षण घेणे हा प्रश्न उपस्थित झाला आहे. सध्याच्या जागतिकीकरणात आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषा देखील ग्लोबल झाली आहे. जागतिकीकरणामुळे भाषिक विविधतेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे मराठी भाषेचे तिच्या विविध बोली भाषेचे संवर्धन कसे करावे हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

आदिवासी जमात नागर संस्कृतीपासून अलिप्त राहिली डोंगरदऱ्या खोऱ्यांचा आश्रय घ्यावा लागला, त्यामुळे एकूणच आदिवासी जमातीची संस्कृती वेगळी होती . सुसंस्कृत समाजापासून दूर डोंगर जंगलात वास्तव्य होते. त्यामुळे आदिवासींनी स्वतःची जीवन जगण्याची कला स्वतः विकसित केली, म्हणूनच आपण त्यांना निसर्गपूजक असे म्हणतो. आधुनिक काळात जागतिकीकरणाच्या रेट्याखाली घटनेने दिलेल्या आरक्षणामुळे काही नवतरुण शिक्षण घेऊ लागले. शिक्षणाच्या प्रसारामुळे नवे आत्मभान आदिवासींना आले. आदिवासी साहित्य स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर उदयास आलेले दिसते. आदिवासी समाजातील नवी पिढी नुकतीच शिकून पुढे येत आहे. आदिवासी जमातीची बोली भाषा स्वतंत्र झाहे. शिक्षणामुळे मराठी भाषेला पर्याय नाही म्हणून मराठी भाषेतून शिकत आहे. परंतु बोलीभाषा वेगळी असल्याकारणाने त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

आदिवासींचे जीवनविश्व साहित्याभावी असेच काहीसे अंधारलेले आहे. परंतु आज आदिवासी साहित्य वृक्ष हा बहरू फुलारु लागला आहे. आदिवासी साहित्य ही नाममुद्रा आज साहित्य क्षेत्रात सुस्थिर व सन्मानित झाली आहे. स्वयंभू बाण्याचे व स्वयंसिद्ध अस्तित्वाचे वेगळे साहित्य म्हणून ते नावारूपाला आले आहे. शालेय विद्यापीठिय अभ्यास क्षेत्रातही हे साहित्य समाविष्ट झाले आहे ही फार आनंदाची बाब आहे. आदिवासी साहित्याला आता थोडे चांगले दिवस आले आहेत. आदिवासी साहित्याच्या सृष्टीत संशोधकीय दमदार पाऊल ज्यांनी टाकले, त्यांच्या नामावलीत प्राचार्य डॉ. गोविंद गायकी, डॉ. राजेंद्र ठाकरे,

डॉ. तुकाराम रोंगटे, पितांबर कोडापे, डॉ. विनोद कुमरे तसेच इतर अभ्यासकही संशोधन करत आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासी साहित्याचा विचार करताना आदिमातेचा शोध आणि जागतिक पातळीवरील एकात्म मानव्याचा शोध हे मुद्दे महत्वाचे ठरणार आहेत. एकात्मतेची ओढ सर्वच मानवी समूहांना लागलेली आहे अशा परिस्थितीत मानवी संस्कृतीच्या मुळाशी आदिवासी संस्कृती हा मूळ स्रोत असण्याची अभ्यासातून, संशोधनातून पुढे येत आहे. आदिवासी भाषा बोली यांची भाषा कुले जागतिक पातळीवर कदाचित एक वंशाची असल्याचे निष्पन्न होण्याची शक्यता दिसते. या सर्व गोष्टींचा विचार करता आदिवासी मराठी साहित्य हे जागतिक आदिवासी साहित्याच्या तुलनेत कमी कालावधीत झपाट्याने लिहिले जात आहेए त्यामुळे जागतिक साहित्य अभ्यासामध्ये मराठी आदिवासी साहित्य हे पायाभूत ठरत आहे. याचा विचार करता आदिवासी साहित्य बोली भाषेत लिहिले जात असले तरी आदिमतेच्या संवेदनासहित आदिम निसर्गावलंबी भौतिक अवस्थेपासून वैज्ञानिक अंतराळ युगापर्यंत परिवर्तन करण्याची आस आदिवासी साहित्यातील भावविश्वात आढळते आहे. एक प्रकारे वैश्विक संस्कृतीच्या मूलभूत विचारांचा आधार या साहित्याच्या अस्तित्वाला आहे म्हणूनच या साहित्याचे भवितव्य अतिशय प्रगल्भ आणि उदात्त अशा मानवी मूल्यांचे प्रकटीकरण करणारे असे आहे. जागतिकीकरणाच्या झपाट्यात जगातील साहित्य आविष्कार आदिवासी साहित्य हे पारदर्शक ठरण्याची शक्यता वाढली आहे.

विविध जमातीतील आदिवासी साहित्यिकांनी आपापले अनुभवविश्व घेऊन साहित्यविश्वात लिहिते होण्याची गरज आहे. तेंव्हा आदिवासी साहित्य अधिकपणे समर्थपणे प्रकटेल, समृद्ध होईल. आपल्या समृद्ध बोलीचा साज घेऊन समृद्ध लोकशाहीत्याचा बाज घेऊन साहित्यविश्वात अवतरण्याची गरज आहे. आज आदिवासी नवतरूण शिकला आहे. आपले अनुभव तो लिहू लागला आहे. परंतु आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात शिकलेला आदिवासी तरूण मागे पडत आहे. कित्येक विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणामुळे अडचणीत येत आहे. जर आदिवासी सुशिक्षित युवा वर्गाने या अडचणी सोडवण्यात पुढे येऊन थोडाफार मार्गदर्शन केल्यास ते मौलिक ठरेल. तंत्रज्ञानाची खरी ओळख करण्याची गरज आहे .ज्या काही थोड्या तरुणांना संगणकाचे ज्ञान आहे. अशा तरुणांनी खेडोपाड्यात जाऊन कार्यशाळा घेतली पाहिजे. इंटरनेट सारख्या विविध तंत्रज्ञानाची ओळख समाजाला करून दिली पाहिजे. आज स्मार्टफोनच्या सगळीकडे प्रसार झालेला असला तरी त्याचा वापर संपर्क व करमणुकी करता केला जातो. याचा वापर तेवढ्यापुरता मर्यादित न राहता त्या पुढे जाऊनही इतर काही महत्वाची कामे त्यावर होऊ शकतात. आज इंटरनेटवर विविध प्रकारच्या शेतीच्या उत्पादनाची व लागवडीची माहिती उपलब्ध आहे ही माहिती समाजापर्यंत गेली पाहिजे. त्यावर साहित्यनिर्मिती केली पाहिजे. जेणेकरून याचा फायदा आदिवासींना शेतीच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी होईल.

आदिवासी संस्कृती ही सर्वश्रेष्ठ प्राचीन संस्कृती आहे .आदिवासी संस्कृती ही भारतीय संस्कृतीचे मूळ आहे . याचा परिचय आपल्याला आदिवासी साहित्यातून होत आहे संस्कृतीची ओळख समाजाला जर ऑनलाईन पद्धतीने झाली तर, त्याचा फायदा संशोधकांना चांगल्याप्रकारे होईल. लोकगीते, लोकनृत्य, लोकसाहित्य हे आदिवासी साहित्यातून चांगल्या प्रकारे जगासमोर येईल कारण आदिवासी संस्कृती ही प्राचीन संस्कृती आहे. भारतीय संस्कृतीचे मूळ आहे. ही जगात सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे याची ओळख समाजाला होईल. चांगली साहित्यनिर्मिती होईल. आदिवासी साहित्य व संस्कृतीची ओळख होईल व जागतिकीकरणात आदिवासी साहित्य तग धरेल. थोडक्यात आजकालच्या या स्मार्टयुगात आदिवासीदेखील स्मार्ट होईल.

आदिवासींचा इतका उज्वल, उदात्त, गौरवशाली सुवर्णाक्षरात लिहून ठेवावा असा दैदिप्यमान इतिहास आहे. जागतिकीकरण हेच मोठे आदिवासी साहित्यापुढे आव्हान आहे. आदिवासींच्या इतिहासाची भारतीय इतिहासात जाणीवपूर्वक उपेक्षा झाली. आज आदिवासींचा गौरवशाली इतिहास उजागर करण्याची मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. आदिवासींचा गौरवशाली इतिहास आदिवासींच्या साहित्य लेखनाची एक महत्वाची प्रेरणा आहे. आदिवासींचा पराक्रमी, सुवर्णशाली इतिहासाचा वारसा आदिवासी समाजाला आहे. हा इतिहास झपाट्याने लिहिला जाण्याची मोठी जबाबदारी आदिवासी विचारवंत व साहित्यिकांवर येऊन पडली आहे. आदिवासींमध्ये विविध जमातीत निर्माण झालेल्या संतांचे कार्यही उपेक्षित राहिले आहे.ते समाजासमोर येण्याची गरज आहे. याची जबाबदारी आदिवासी विचारवंतांवर साहित्यिकांवर आली आहे.

आदिवासी संतांचे विचार समाजासमोर येण्याची गरज आहे.

आदिवासी जमातीतील साहित्यिकांनी लिहिते होण्याची गरज आहे. आदिवासी चळवळीचा मुख्य उद्देश म्हणजे अस्मिताजागर, संस्कृतीजागर करणे आहे. आदिवासी साहित्यामध्ये समाज दर्शनाबरोबरच परिवर्तन उपेक्षित आहे. आदिवासींमध्ये अनेक ज्वलंत समस्या आहे. त्या आ वासून उभ्या आहे. कुपोषण, स्थलांतर, विस्थापन, पुनर्वसन, बोगस आदिवासी, धर्मांतर, शासकीय योजनांतील भ्रष्टाचार, नक्षलवाद, आरक्षणावर आक्रमण, संस्कृती विकृतीकरण, स्त्रियांचे होणारे लैंगिक शोषण या सर्व प्रश्नांचे मंडन आदिवासी साहित्यातून तीव्रतेने होताना दिसते. आदिवासी हे भूमिपुत्र आहेत त्यांच्याकडून जल, जंगल आणि जमीन असे सर्वच हक्क हिरावून घेतले ते त्यांना मिळाले पाहिजे. हा आदिवासी चळवळीचा उद्देश आहे.

भारतावर ज्या ज्या वेळी परकीय आक्रमणे झाली, त्या त्या वेळी येथील आदिवासी जमातींनी त्यांना अत्यंत प्रखरपणे विरोध केला. इस्लामच्या आक्रमणाविरुद्ध लढताना राणी दुर्गावती पासून ते पुंजा भिल्लापर्यंत अनेक आदिवासी शूरवीरांनी आपल्या प्राणाचे बलिदानही दिले. ब्रिटीशांविरुद्ध लढताना आदिवासींनी १०० हून अधिक लहान-मोठे सशस्त्र संघर्ष केले. या संघर्षात अनेक आदिवासी वीर हुतात्मा झाले. आदिवासींचा गौरवशाली इतिहास हा आदिवासी आणि सर्वहरा समाजासमोर येण्याची जबाबदारी जागतिकीकरणात आदिवासी, विचारवंत, साहित्यिक, संशोधक यांच्यापुढे एक मोठे आव्हान आहे. तरच आदिवासी साहित्य जागतिकीकरणात तग धरेल.

**संदर्भ**


- *धरतीअबा' जनचेतनेचे विद्रोही रूप (वीर बिरसा मुंडा चरित्र), प्रा.डॉ.विनायक तुमराम, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर २००० पृ .२४ ते २६.*
- *स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतिकारक' डॉ. गोविंद गारे, श्री विद्या प्रकाशन, पुणे*
- *ऊलगुलान, भुजंग मेश्राम, तथागत प्रकाशन, कल्याण (पूर्व) प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९९०*
- *बिरसा मुंडा – विकिपीडिया*
- *क्रांतिसूर्य बिरसा मुंडा - AYUSH | Adivasi Yuva*
- *१० वे अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन, नांदेड दि -२५ व २६ एप्रिल २०१५*